। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425001
रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

# जाहीर प्रकटन

(अ) सर्व संबंधितांना या जाहीरप्रकटनाव्दारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठे, कायदा १९९४ मधील कलम ९९ उपकलम १ अन्वये विद्यापीठाने पदवीधरांची नोंदवही ठेवावयाची असते. पदवीधरांच्या नोंदवहीत-

(१) ज्या उमेदवारांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पदवी प्राप्त केलेली आहे असे पदवीधर; नोंदणीकृत पदवीधर म्हणून नावे नोंदवू शकतील.

(२) नावे नोंदणी करण्यासाठी पुणे विद्यापीठाचे जे पदवीधर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास आहेत अशा व्यक्ती पदवीधर नोंदवहीत नावे नोंद करु शकतील. तथापि, अशा पदवीधरांनी पुणे विद्यापीठामधे जर नावे नोंदविली असतील तर पुणे विद्यापीठांतर्गत केलेली नोंदणी त्यांना रद्द करावी लागेल.

महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ मधील कलम ९९ उपकलम (२) नुसार खालील व्यक्ती पदवीधर नोंदवहीत नावे नोंदविणेसाठी अपात्र ठरतील.

i) मानसिक संतुलन गमावलेली आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेली व्यक्ती.
ii) अमुक्त नादार व्यक्ती .
iii) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल, अशा एखाद्या अपराधाखाली सक्षम न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आलेली व्यक्ती.
iv) महाराष्ट्र राज्यात कायद्यान्वये स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर असेल अशी व्यक्ती.

(३) महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९९ (३) नुसार नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी ज्यांनी विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्र प्राप्त केले आहे अशा व्यक्तींना विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा लागेल. तसेच कलम ९९(५) नुसार मतदार यादीबाबत तरतूदीचा विचार करता, **दि. १३.०४.२०१५** पर्यन्त ज्यांचा नोंदणी अर्ज किंवा मतदार यादीत नाव येण्यासाठीचा अर्ज प्राप्त होईल अशाच उमेदवारांचा सन २०१५ मध्ये होणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांच्या दहा जागांच्या निवडणूकीसाठी नोंदणीकृत पदवीधर मतदार म्हणून मतदार यादीत समावेश केला जाईल.

(४) नाव नोंदणीसाठी व मतदार यादीत नावाचा समावेश होण्यासाठी विद्यापीठाच्या ***www.nmu.ac.in*** या संकेतस्थळावर Election Link मध्ये असलेल्या विहित नमून्यात ऑनलाईन माहिती भरुन अर्जाची प्रत व पोच पावती स्वतंत्र पानावर डाऊनलोड करुन त्याची प्रत विद्यापीठाने विहित केलेल्या खालील केंद्रावर रुपये १२/- मात्र रोख शुल्काने जमा करावी व संबंधीत केंद्राकडून अर्ज जमा केल्याची पावती प्राप्त करावी. सदर अर्ज कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते १५.०० या वेळेत **दिनांक १४.०३.२०१५** पासून दि. १३.०४.२०१५ पर्यन्त जमा करावेत.

..२..

ज्यांना आपल्या अर्जाच्या प्रती थेट विद्यापीठास पाठवावयाच्या असतील त्यांनी अर्जाच्या प्रतींसोबत रुपये १०/- इतके शुल्क डी.डी / आय.पी.ओ. स्वरुपात जमा करावे लागतील. डी.डी / आय.पी.ओ. वित्त व लेखा अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या नावाने काढावे. विद्यापीठात रोख स्वरुपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

| **Collection and Polling Centre Numbers** | **Place of Collection and Polling Centre** |
|---|---|
| 101 | Smt. G.G. Khadase Sci. & Arts, College, **Muktainagar.** |
| 102 | Raver Parisar Shikshan Prasarak Mandals Arts, Com. & Sci., College, **Raver.** |
| 103 | Dhanaji Nana Arts, Sci. & Com., College, **Faizpur** |
| 104 | Tapti Edn. Society's Bhusawal Arts, Sci. & P. O. Nahata Comm. College, **Bhusawal.** |
| 105 | Gitabai Dattatrya Mahajan Arts, Shri Keshrimal Rajmal Navlakha Com. & Manoharsheth Dhariwal Sci. College, **Jamner.** |
| 106 | Khandesh College Edn. Society's M. J. College of Arts, Sci. & Com., **Jalgaon.** |
| 107 | Rashtriya Arts, Sci. & Com. College, **Chalisgaon.** |
| 108 | Pachora Taluka Co-op Edn. Society's Arts, Sci. & Com. College, **Pachora.** |
| 109 | Dadasaheb D.S.Patil, Arts, Sci. & Com. College, **Erandol.** |
| 110 | M.G.T.S.M's Arts, Sci. & Com. College, **Chopda.** |
| 111 | K.E.M.E.S. Pratap College of Arts, Sci. & Com., **Amalner.** |
| 112 | K.V.P.S's Arts, Com. & Sci. College, **Parola.** |
| 113 | Arts, Science & Commerce College, **Dharangaon.** |
| 114 | D.E.S's Palesha Commerce College, **Dhule.** |
| 115 | Vidya Vikas Mandals's Arts, Sci. & Com. College, **Sakri.** |
| 116 | K.V.P.M's Smt. P.D.M. Arts, Smt. H.D.Com. & S.M.A. Sci. College, **Shirpur.** |
| 117 | S.S.V.P.S's S.D. Patil Arts, Com. & Sci. College, **Shindkheda.** |
| 118 | S.S.V.P.S's Smt. Bagal Arts & Com. College, **Dondaicha.** |
| 119 | P.S.G.V.P.M's Sci., Com. & S.I.Patil Arts College, **Shahada.** |
| 120 | A.S.M's C.H.C. Arts, Sci. & S. G. P. Com. College, **Taloda.** |
| 121 | A.S.S.S's College of Education, **Navapur.** |
| 122 | V.V.M's Arts & Com. College, **Akkalkuwa.** |
| 123 | Jijamata Arts, Sci. & Com. College, **Nandurbar.** |

(ब) महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २५ (२) (र) संदर्भात शासनाने निवडून येण्यासाठी क्र. युएसजी-2009 /(85/09) विशि-4, दि. 12 ऑक्टोबर, 2009 नुसार पात्रता व शर्ती मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा केली आहे. (1) Registered Graduates shall not include graduates falling in the categories of teachers (Regular / Contract basis) Principals / Heads of the Department / Managements or any other categories mentioned in this sub-section. (2) Shall have graduated at least ten years prior to the date of the election (3) Shall not be an office bearer of any Affiliated College, Institutions, Recognized Institutions. **नोंदणीकृत पदवीधर मतदार यादीत मतदार म्हणून नावे नोंदणीसाठी विद्यापीठाने ऑनलाईन नोंदणीची सुविधा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर Election Link वर उपलब्ध केलेली असून ऑन लाईन अर्ज भरुन त्याची प्रिन्ट घेऊन ती प्रत या प्रकटनात विहित केलेल्या केंद्रावर दि. १४.०३.२०१५ ते दि.१३.०४.२०१५ पावेतो जमा करावेत.**

**प्रकटनातील (अ) व (ब)नुसार ऑन लाईन अर्ज भरतांना पदवीधरांनी प्रथम अर्ज भरण्यासंबंधीच्या सर्व सूचना व्यवस्थित वाचाव्यात. पदवी प्रमाणपत्रावरील डिग्री कोड अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. पदवी प्रमाणपत्रावर डिग्री कोड प्रमाणपत्राच्या उजव्या बाजूला खालच्या कोपऱ्यात असून आडव्या पदवी प्रमाणपत्रावर सदर कोड काही प्रमाणपत्रांवर पदवी प्रमाणपत्राच्या उजव्या बाजूस खाली कोपऱ्यात किंवा मागील बाजूस आहे.**

पदवी प्रमाणपत्र कोड व्यवस्थित बिनचुक नमूद करावा, त्यात चुक झाल्यास आपले नाव नोंदवहित किंवा मतदार यादीत समाविष्ट होणार नाही व त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

(क) नोंदणीकृत पदवीधर संघाचा मतदार म्हणून मतदार यादीमधे नोंद होण्यासाठी **दि.१३/०४/२०१५** नंतर विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज हे नस्तीबध्द करण्यात येतील.

(ड) नविन नोंदणी अर्जासोबत पदवी अभ्यासक्रमाची पदवी प्रमाणपत्राची साक्षांकित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अर्जावर नजीकच्या काळातील काढलेले छायाचित्र चिटकवावे व अर्जावर स्वाक्षरी केलेली असावी. अपूर्ण असलेले अर्ज नस्तीबध्द करण्यात येतील व त्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(इ) ज्या पदवीधरांनी या पूर्वी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पदवीधर म्हणून नाव नोंदणी केलेली असेल अशा व्यक्तींनी पदवी प्रमाणपत्राची प्रत जोडण्याची व छायाचित्र द्यावयाची आवश्यकता नाही. तथापि, प्रकटनातील (ब) नुसार मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी अर्ज सादर करणे व रोख शुल्क रुपये १२/- मात्र संबंधीत केंद्रात भरणे आवश्यक आहे. त्यासाठी मागील नोंदणी क्रमांकांची नोंद अर्जात करणे आवश्यक राहील. सन २०००, २००५ व २०१० मध्ये नोंदणी केलेल्या पदवीधरांची माहिती नोंदणी क्रमांकासहित संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(ई) निदेश, निवडणूक कार्यक्रम, मतदार याद्या इ. बाबी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेत स्थळावर Election Link मध्ये वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील व त्याबाबतची सूचना बातमीरुपाने वृत्तपत्रातून दिली जाईल. वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील माहिती सर्व संबंधितांनी ज्ञात करुन घेणे आवश्यक आहे.

स्थळ : जळगाव

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/०८/२०१५ दि:१३/०३/२०१५

Sd/- xxx

**(प्रा.अ.म.महाजन)**

कुलसचिव तथा

निवडणूक निर्णय अधिकारी.

F:RG_Prakatan2015_ 23012015

**पत्र पेटी क्र. :८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. :०२५७-२२५७४२८ ते २२५७४३८,(२२५७३४८)**

**फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६**

**Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2258428 to 2258438, (2257348)**

**Fax Nos. : 0257-2258403, 406 E-mail Id ; registrar@nmu.ac.in & election2015@nmu.ac.in**